UGC CARE LISTED
ISSN No.2394-5990

# संशोधक

• वर्ष : ९० • डिसेंबर २०२२ • पुरवणी विशेषांक ०७

आज़ादी का
अमृत महोत्सव

स्थापना : १ जानेवारी १९१७

इतिहासाचार्य वि. का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे

UGC CARE LISTED
ISSN No. 2394-5990

# इतिहासाचार्य वि. का. राजवाडे मंडळ, धुळे
## या संस्थेचे त्रैमासिक

# ।। संशोधक ।।

पुरवणी अंक ७ – डिसेंबर २०२२ (त्रैमासिक)

• शके १९४४ • वर्ष : ९० • पुरवणी अंक : ७

संपादक मंडळ

• प्राचार्य डॉ. सर्जेराव भामरे • प्रा. डॉ. मृदुला वर्मा • प्रा. श्रीपाद नांदेडकर

अतिथी संपादक

• डॉ. गिझाला हाश्मी • डॉ. सिद्धार्थ हरिदास मेश्राम • प्रो. मोहम्मद असरार

* प्रकाशक *

श्री. संजय मुंदडा

कार्याध्यक्ष, इ. वि. का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे ४२४००१
दूरध्वनी (०२५६२) २३३८४८, ९४०४५७७०२०

कार्यालयीन वेळ

सकाळी ९.३० ते १.००, सायंकाळी ४.३० ते ८.०० (रविवारी सुट्टी)

मूल्य रु. १००/-
वार्षिक वर्गणी रु. ५००/-, आजीव वर्गणी रु. ५०००/- (१४ वर्षे)

**विशेष सूचना :** संशोधक त्रैमासिकाची वर्गणी चेक/ड्राफ्टने 'संशोधक त्रैमासिक राजवाडे मंडळ, धुळे' या नावाने पाठवावी.

**अक्षरजुळणी :** सौ. सीमा शिंत्रे, वारजे-माळवाडी, पुणे ५८.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकेच्या प्रकाशनार्थ अनुदान दिले आहे. या नियतकालिकेतील लेखकांच्या विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.

# अनुक्रमणिका


१. डिजिटल युगात ग्रंथालय सेवांचा प्रचार करण्यासाठी सोशल मीडियाचा वापर
– आशीष ठाणेकर ---------- ७

२. हितं मनोहारी च दुर्लभम् ।
– डॉ. अबोली व्यास ---------- ११

३. कृषी अर्थव्यवस्थेवर गांधी विचारांची प्रासंगिकता – एक आर्थिक सिंहावलोकन
– प्रा. बोधे श्रीकृष्ण बी ---------- १५

४. संजय गांधी निराधार योजनेचे ग्रामीण विकासात योगदान
– प्रा.डॉ. राजेश प्रल्हाद कांबळे, प्रा.मनिषा दर्शन बारसागडे ---------- १९

५. गांधीचा ग्रामीण भारत, स्व:शासन, आणि ग्रामीण शाश्वत विकास
– डॉ. नितीन सुरेशराव कायरकर, डॉ. सचिन पत्रूजी भोंगेकर ---------- २२

६. जिल्हा उद्योग केन्द्राचे कार्य व भूमिका एक विश्लेषणात्मक अध्ययन
– डॉ. महेन्द्र पांडुरंगजी गावंडे ---------- २५

७. भारतीय लोकशाही पुढील नवीन आव्हाने (एक महत्वपूर्ण आर्थिक अवलोकन)
– सहा. प्रा. डॉ. रवी एस. सोरते ---------- ३०

८. स्वातंत्र्यपूर्व भारतीय वाहतूक व्यवस्थेत रस्त्याचा विकास
– डॉ. देवीदास ग्यानोजी गाडेकर ---------- ३६

९. वाल मजूर व मानवाधिकाराची उपेक्षा
– डॉ. मंजूषा राजेंद्र ठाकरे ---------- ४१

१०. शांता शेळके यांचे भावगीत : एक चिंतन
– डॉ. नरेंद्र ईश्वर घरत ---------- ४५

११. दलित आत्मकथने: मराठी साहित्यातील महत्त्वाचा वाङ्मयीन आविष्कार
– डॉ. पराग मुरलीधर सपाटे ---------- ५०

१२. राष्ट्रीय अन्न सुरक्षा – सद्यस्थितीचे विश्लेषण (जागतिक उपासमारी निर्देशांक२०२२ च्या संदर्भात)
– डॉ. पंकज तायडे ---------- ५४

१३. भारतातील पर्यावरणाचे संरक्षण आणि शाश्वत विकासापुढील आव्हाने
– डॉ. संदीप तुंडूरवार, श्री. भास्कर वघाळे ---------- ५९

४३. तथागत गौतम बुद्धाचे अर्थशास्त्र
– डॉ. सिद्धार्थ हरिदास मेश्राम ---------- १९१

४४. राज्यपुर्नरचना आयोग आणि विदर्भ
– डॉ. शरद सांबारे, डॉ. राजन महाजन ---------- १९६

४५. महिला विकासाच्या वाटचालीमध्ये कायद्यांची मदत
– सारंगा किसन गेडाम ---------- २०१

४६. भारतीय अर्थव्यवस्था व डिजिटल मुद्रा– एक आर्थिक विवेचन
– प्रा.सतीश आर.जाधव ---------- २०५

४७. वसाहतोत्तर भारतातील गोंडवाना चळवळ
– प्रा.डॉ. सतीश रामदास महल्ले ---------- २०९

४८. गोरबंजारा समाजावरील शहरीकरणाचा प्रभाव: महाराष्ट्राच्या विशेष संदर्भात
– प्रा. सतिश बं. राठोड ---------- २१३

४९. गडचिरोली जिल्ह्यातील रमाई आवास योजनेचा आढावा
– सतिश शामराव खोब्रागडे, प्रा. डॉ. राजेश प्रल्हाद कांबळे ---------- २१७

५०. राष्ट्रीयकरणानंतर भारतीय बँकांची प्रवृत्ती एक अभ्यास
– डॉ. शंकर मारोती सावंत ---------- २२०

५१. महाविद्यालयीन मुलांच्या शारीरिक बदलांवर कपालभातीचा होणाऱ्या परिणामाचे अध्ययन
– डॉ.सुभाष एस. दाढे ---------- २२५

५२. आभासी चलन आणि भारतातील सद्यस्थिती
– डॉ. सुरेखा भिंगारदिवे ---------- २३०

५३. कोविड–१९ चा भारतीय अर्थव्यवस्थेवर झालेला परिणाम
– प्रा. डॉ. टी. एम. गुरनुले ---------- २३३

५४. माडिया आदिवासीचे उद्धारक – डॉ.प्रकाश बाबा आमटे
– प्रा.संजय उत्तमराव उगेमुगे, डॉ .प्रकाश.आर. शेंडे ---------- २३८

५५. मराठी साहित्यात अनुस्यूत मानवतावादी मूल्ये : एक परीक्षण
– प्रा.डॉ. विजय रुपराव राऊत ---------- २४२

५६. खान्देशातील कृषी क्षेत्र आणि शेतकरी
– डॉ.विनोद आत्माराम नन्नवरे ---------- २४६

५७. भारताच्या नवीन शैक्षणिक धोरणाची समिक्षा
– डॉ. विठ्ठल घिनमिने ---------- २५०

# मराठी साहित्यात अनुस्यूत मानवतावादी मूल्ये : एक परीक्षण

प्रा.डॉ. विजय रुपराव राऊत
सहयोगी प्राध्यापक, मराठी विभाग
श्री पंढरीनाथ कला वाणिज्य महाविद्यालय,
नरखेड जि.नागपूर पिन- ४४१३०४
मो. ९८५०२३६८७९, ई-मेल-parambiraut@gmail.com

**सारांश (abstract ) :**

मराठी साहित्यातील परंपरागत विचारसरणी दूर सारून अखिल मानवासाठी कल्याणकारी, उन्नयनात्मक वैचारिक मूल्यांची पेरणी होणे हे मराठी साहित्याचे निरोगी लक्षण ठरते. दिवसेंदिवस मानवता नष्ट होत चाललेल्या समाजात इष्ट, नैतिक बीजांची रुजवण होणे अत्यावशक होते; ती काळाची गरज मराठी साहित्याने सामाजिक, कालिक भान ठेऊन पूर्ण केली ही कृती साहित्याची सार्थकता व समर्थकता दर्शवणारी ठरते. मराठी साहित्यिकांना मानवतावादाची उपयोगिता लक्षात येऊन त्यासाठी त्यांनी केलेली साहित्यनिर्मिती खरोखरच मानवी अभ्युदय साधण्यासाठी महत्त्वाची आहे.कथा, कविता, कादंबरी, नाटक इत्यादी साहित्यप्रकारांतून झालेले मानवी सर्जन उल्लेखनीय आहे.

बीजशब्द : मानवतावाद, मानवी मूल्य

**प्रस्तावना :**

मराठी साहित्य सर्वसमावेशक आहे.त्यात भारतीय तत्त्वज्ञानाबरोबरच परकीय तत्त्वज्ञानाचाही समावेश झालेला आहे. जे-जे चांगले, समाजहितकारक, मानवी कल्याणाला उपयोगी त्या-त्या सर्व तत्त्वज्ञानाचा समावेश मराठी साहित्यात अंतर्भूत झालेला दिसतो.त्यात विविध वाद, मूल्ये, विचारसरणीचा समावेश होतो. या सर्वसमावेशक वृत्तीमुळेच मराठी साहित्याचा उत्तोरोत्तर विकास होताना दिसतो.

मानवतावाद हा मराठी साहित्याचा स्थायीभाव आहे,असे म्हटले तरी ते अतिशयोक्ती होणार नाही. संत ज्ञानेश्वरांपासून आजच्या युगापर्यंत हा मानवतावाद अधिकाधिक विस्तारात गेलेला दिसतो. संत ज्ञानेश्वरांचे ज्ञानेश्वरीतील पसायदान म्हणजे संपूर्ण मानवजातीच्या कल्याणासाठी केलीली प्रार्थना ठरते.

''जे खळांची व्यंकटी सांडो । तया सत्कर्मी राती वाढो
भूतां परस्परे जडो ।मैत्र जीवांचे ।।
दुरितांचे तिमिर जावो । विश्व स्वधर्मे सूर्ये पाहो
जो जे वांछील तो ते लाहो । प्राणिजात ।।''
(पसायदान,संत ज्ञानेश्वर)

ही संत ज्ञानेश्वरांची प्रार्थना अखिल मानवजातीच्या कल्याणाचा जाहीरनामा ठरतो. मानवाच्या सुखासाठी, आनंदासाठी, कल्याण-साहचर्याकरिता मागितलेले हे पसायदान म्हणजे मराठी साहित्यात मानवतावाद दृढ करणारी महत्त्वाचे घटीत आहे.

**मराठी साहित्यात प्रतिबिंबित झालेले मानवतावादाचे स्वरूप :**

मानवतावादाची कास धरणारे महत्वाचे कवी म्हणजे आधुनिक मराठी काव्याचे जनक केशवसुत हे होत. केशवसुतांनी परंपरागत काव्याला आधुनिकतेकडे नेले. आपली कविता निव्वळ सौंदर्याची कविता न ठेवता तिला सामाजिक आशयाची जोड दिली, त्यांची कविता दलित, गरीब, शोषितांच्या जीवनाचा वेध घेणारी ठरली. 'स्फूर्ती', 'तुतारी', 'अंत्यजाच्या मुलाचा पहिला प्रश्न'इ. कविता मानवतावादाचा पुरस्कार करणाऱ्या कविता आहेत.

''क्लृप्तीची मग नौका करुनि व्योमसागरावरी जाऊ
उडुरत्ने या गरीब धरेला तेथुनि फेकुनि देऊ''
('स्फूर्ति' केशवसुत )

'स्फूर्ती' या कवितेतील केशवसुतांच्या या ओळी 'गरीब' धरेची चिंता करताना दिसतात. गरिबांच्या कल्याणाकरिता ते देवांशी सुद्धा झगडण्याची भाषा करताना दिसतात. ''नव्या युगाचा शिल्पकार अखेरीस मानवच आहे याची त्यांना प्रखर जाणीव होती. त्याकरिता आवश्यक असणारी संस्कारित उच्च दर्जाची विचारशीलाता केशवसुतांजवळ होती.''[१] केशवसुतांना मानवतावादी मूल्यांची जोपासना देवापेक्षाही महत्वाची वाटते.यावरून केशवसुतांच्या मानवतावादी विचाराची व्यापकता सिद्ध होते.

कुसुमाग्रजाची कविता माणसाच्या अवतीभवतीचे, त्यांच्या गंभीर प्रश्नांचे रेखाटताना दिसतात.धगधगीत वास्तव रेखाटन करणारी कविता असे कुसुमाग्रजांच्या कवितेचे वर्णन करता येईल. भांडवलशाहीत मजुरांचे होत असलेले शोषण त्यांना अमान्य आहे. म्हणूनच त्या शोषणाविरुद्ध लढण्याची भाषा त्यांची कविता करते. मानवी मूल्यांची होत असलेली होळी

त्यांना उद्विग्न करते. कुसुमाग्रजांची कविता काळाचे भान ठेऊन तसेच "स्वतःच्या राष्ट्राच्या सीमा ओलांडून तिने सगळ्या मानवजातीच्या सुखःदुःखाशी आपले नाते जोडले."[२] भांडवलशाही संकटात सापडलेला माणूस 'हिमलाट', 'आगगाडी आणि जमीन', 'आहि-नकुल', 'जा जरा पूर्वेकडे', इ. कवितांमधून चितारलेला आहे. माणसाला आपल्या स्वार्थासाठी गुलाम बनविणाऱ्या वृत्ती-प्रवृत्तीवर कुसुमाग्रजांची कविता तुटून पडते. त्याचप्रमाणे अनिलांची 'मानवता' ही कविता प्रखर मानवतावादी दृष्टीकोनाचा पुरस्कार करताना दिसते.

विसाव्या शतकाच्या मध्यापर्यंत मराठी साहित्यातील मानवतावादी दृष्टी विकसित झालेली दिसते. साहित्यात या काळापर्यंत विशिष्ट समाजातील सुख-आनंद. चैन. त्यांचे दुःख. भोग इत्यादी गोष्टींचे उल्लेखच मोठ्या अलंकारिक भाषेत होत होते. माणूसपण हरवल्याची चिंता हे साहित्य करीत नव्हते पण दुसऱ्या महायुद्धाच्या अतिविध्वंसानंतर झालेली मानवी मूल्यांची होळी, नैतिक पतन, हाल-अपेष्टा. हरवलेली स्वप्ने या सर्वांचा शोध घेण्याचा प्रयत्न १९४५ नंतरच्या साहित्यात झाला असे दिसून येते. दुसऱ्या महायुद्धात झालेल्या प्रचंड मानवहानीनंतर मानवी अस्तित्वाची दखल अखिल जगाबरोबरच मराठी साहित्याने सुद्धा घेतली .मानवाचे या पृथ्वीवरील अस्तित्त्व काय?हा प्रश्न जगातील इतर साहित्यावरोबर मराठी साहित्यातही चर्चिला जाऊ लागला.

वा. सी. मर्ढेकरांची कविता ही नवकविता म्हणून ओळखली जाते. मर्ढेकरांनी आपली कविता समकालीन वास्तवाच्या आधारे लिहिली. यंत्रयुगात मानवाचे होत असलेले खच्चीकरण, गरिबी, लाचारी, शोषण तसेच हरवत चाललेली मानवी मूल्ये याचे प्रभावी पण विडंबनपूर्ण वर्णन मर्ढेकरांनी 'काही कविता', 'आणखी काही कविता' या कवितासंग्रहातून केलेले दिसते. यंत्रयुग, भांडवलशाहीमुळे मानवी जीवनव्यवस्थेची होणारी फरफट याचे चित्रण अत्यंत उपहासपूर्ण रीतीने करताना दिसतात. "मानवाच्या मूलभूत प्रश्नापासून ते दूर नाहीत कारण विश्वव्यवस्थेशी असणाऱ्या आपल्या भावना, नात्यांचा, सेंद्रिय ऐक्याचा त्यांना विसर पडत नाही. समाजवादाच्या किंवा विज्ञानवादाच्या पराभवाच्या प्रत्ययानंतर मानवी कल्याणासाठी असणाऱ्या इतर मार्गाचा शोध त्यांची प्रज्ञा घेऊ बघते."[३] व याच समाजजाणिवेतून मर्ढेकरांची कविता समोर येताना दिसते. मर्ढेकरांनी मुंबईतील माणसांचे जीवन आपल्या कवितेतून साकारले; मुंबईसारख्या मोठ्या शहरात पोटाची खळगी भरण्यासाठी, जीवाची ओढाताण करून जीवन जगणारा माणूस हा अस्तित्वहीन झालेला आहे, किड्यामुंग्यांप्रमाणे त्याचे जीवन शुल्लक आणि अर्थहीन झालेले आहे, असे मर्ढेकरांना वाटते. मर्ढेकरांची कविता माणूस हाच विषय केंद्रस्थानी ठेऊन लिहिलेली कविता आहे.

स्वातंत्र्योत्तर काळात अतिशय प्रभावी वास्तव रेखाटणारे कवी शरच्चन्द्र वेगळ्या आशयाची कविता मांडतांना दिसतात. मुक्तिबोधांनी नवी सामाजिक मानवतावादी दृष्टी मराठी साहित्याला दिली. 'नवी मळवाट' , 'यात्रिक', या कवितासंग्रहातून त्यांनी वास्तवदर्शी कविता लिहिली. मार्क्सवादाबरोबर मानवतावादाचाही भक्कम पुरस्कार त्यांची कविता करताना दिसते. त्यांची मानवतावादी भूमिका 'सृष्टी ,सौन्दर्य आणि साहित्यमूल्य' या ग्रंथात स्पष्ट झालेली आहे. या ग्रंथात त्यांनी 'मानुषता' नावाचा सिद्धांत मांडला . माणसाचा माणूस म्हणून स्वीकार करणारा हा सिद्धांत आहे . मुक्तिबोधांच्या मते, ललित वाङ्मयाचे प्राणभूत तत्त्व रस नव्हे , लय नव्हे तर 'मानुषता' हे होय. 'मानुषता'हे बदलत्या सामाजिक मूल्यांचे अधिष्ठान आहे . सामाजिक मूल्यात जीवन हा मानवी अस्तित्वाचा एक पैलू आहे, तर मानुषता हा त्याच मानवी अस्तित्वाचा दुसरा पैलू आहे. एक परिवर्तनशील तर दुसरा शाश्वत आहे. मानुषता हे मानवाचे मुळातले 'असणे' आहे. मानुषता व प्रत्यक्ष सामाजिकता यातले द्वैत नष्ट करणे हे या प्रक्रियेचे उद्दिष्ट आहे. मानुषता, सकालात्म मानुषता हेच ललितकृतीचे संघटक तत्त्व होय."[४] असे मत प्रतिपादन करून मुक्तिबोधांनी मानवतावादी मूल्यांवर भर दिला.

स्वातंत्र्यानंतर साहित्यात नवनव्या मानवी मूल्यांची पेरणी होऊ लागली. नवकथा म्हणून समोर आलेल्या साहित्यप्रकारात गंगाधर गाडगीळांनी मानवतावादाची कास धरलेली दिसते. खरे तर त्या काळी कथा हा साहित्यप्रकार जनसामान्यांपर्यंत पोहचणारे प्रभावी माध्यम होते. त्या माध्यमातून गाडगीळांनी आपली मानवतावादी भूमिका अचूक मांडली, 'किडलेली माणसे' या कथासंग्रहातील कथा याचे उत्तम उदाहरण आहे. 'खडक आणि पाणी' या समीक्षा ग्रंथात त्यांची मानवतावादी भूमिका स्पष्ट होते. ते म्हणतात, "साहित्याचा हेतू माणसांचे अनुभवाचे विश्व संपन्न करणे हा असतो. हे करण्याकरिता अनुभव घेण्याच्या नव्या आणि भिन्न पद्धती साहित्यातून व्यक्त झाल्या पाहिजेत. अनुभवांचे सूक्ष्मतर स्वरूप वाचकांच्या प्रत्ययास आले पाहिजे. अनुभवांच्या अनेक पातळ्यांवर वाचकांचे मन गेले पाहिजे. हे सगळे करायचे म्हणजे सर्वसामान्य अनुभवाचे चित्रण करून भागणार नाही. त्याकरिता असामान्य अनुभवांचे चित्रण केले गेले पाहिजे. आपण सगळे समाजाचे घटक आहोत हे जितके खरे आहे तितकेच आपण व्यक्ती आहोत हे देखील खरे आहे."[५] मानव प्राणी म्हणून केवळ जगणे, मैथुन करणे, जमात वाढवणे हा हेतू मानवाचा जगन्याचा मुख्य हेतू नसावाच. माणूस म्हणून आपल्या मानवी अस्तित्वाशी प्रामाणिक राहणे, सर्व मानवाचे

उन्नयन साधणे हाच असावा असे गाडगीळांना वाटते. भालचंद्र फडके 'सहा कथाकार' पुस्तकाच्या प्रस्तावनेत म्हणतात, ''जीवन आणि मानवी अस्तित्व जाणण्याच्या ओढीतून कथालेखकाला जाणवलेले अनुभवविश्व कथारूप धारण करते.''[५] म्हणूनच आपण 'सगळे समजाचे घटक'आहोत असे ते आवर्जून सांगतात.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांची 'ग्रामगीता' मानवी मूल्यांची आराधना करणारी आदर्श ग्रंथरचना ठरते. आपल्या साध्या लोकभाषेत रचलेल्या भजनांतून जी लोकजागृती झाली ती कदाचितच भाजनासंदर्भात अन्य कवीला साधता आली असेल. खेड्यापाड्यात जाऊन महाराजांनी समाजाला विश्वबंधुत्वाची शिकवण दिली. सर्वधर्मसमभावाचे दर्शन त्यांच्या ङ्ग्रामगीताफ या ग्रंथात प्रत्येक ओळीतून प्रतीत होते. 'या भारतात बंधुभाव नित्य वसू दे ,दे वरची असा दे' या ओळी म्हणजे अखिल बंधुत्वासाठी प्रयत्नरत असलेल्या मानवाचा हुंकारच होय.

१९६० च्या नव्या पिढीतील मार्क्सवादी कवी नारायण सुर्वेंची कविता प्रत्यक्ष अनुभवातून प्रसवलेली दिसते. प्रत्यक्ष जगण्यातून उमगलेल्या मानवी उन्नयनाच्या नव्या मार्गाचा ध्यास सुर्वेंची कविता घेताना दिसते. म्हणूनच त्यांना 'बकरा महाग आणि माणूस स्वस्त' झालेला दिसतो; खरे तर जागतिकीकरणात होत असलेला मानवी ऱ्हासाची दखल सुर्वेंची कविता घेताना दिसते. त्यांच्या 'सनद', 'जाहीरनामा', 'माझे विद्यापीठ' ह्यासारख्या कवितासंग्रहातून सुर्व्यांनी गिरणीतील कामगारांची होणारी पिळवणूक, भांडवलदारांचे कामगारांवर होत असलेले अमानुष अत्याचार, कामगारांच्या वाट्याला आलेले दरिद्री जीवन या सर्वांचे दर्शन सुर्व्यांनी मोठ्या आस्थेने आपल्या कवितांमधून घडविले आहे. समकालीन समाज वास्तवातून सुर्वे माणसांवर लक्ष केंद्रित करतात. गरीब, कामगार माणूस त्यांच्या कवितेचा विषय होताना दिसतो. याला मानवतावादाशिवाय दुसरे नाव देता येण्यासारखे नाही. म्हणूनच 'माझे विद्यापीठ' या कवितेत 'माणसासारखा सृजनत्मा मला भेटलाच नाही' असे सुर्वे म्हणतात.

१९६० नंतर दलित साहित्याचा प्रवाह मराठी साहित्यात येऊन मिळाला. भारतीय समाजाने 'शूद्र' म्हणून वर्षानुवर्षे तुडवलेल्या माणसांचे हे साहित्य आंतरिक जाणिवेतून निर्माण झाले आहे. एका मानवाचा दबलेला आवाज, इच्छा या साहित्याने समाजाच्या सर्व स्तरापर्यंत पोहोचविल्या. माणसाच्या माणूस असण्याची जाणीव त्यांना आपल्या साहित्यातून करून दिली. दया पवार, बाबुराव बागुल, नामदेव ढसाळ, केशव मेश्राम, डॉ. यशवंत मनोहर इत्यादी साहित्यिकांनी आपल्या साहित्यातून दलित जाणिवांचे रेखाटन करताना वेळोवेळी 'आम्हीही तुमच्यासारखेच माणूस आहोत' अशी आरोळी ठोकली. आपले माणूसपण सिद्ध करण्यासाठी झटत असलेले दलित साहित्य मानवतावादाच्या जवळ जाणारे ठरते.

स्वातंत्र्योत्तर काळातील कादंबरी क्षेत्रात शरच्चंद्र मुक्तिबोध, पु. शि. रेगे, चिं. त्र्य. खानोलकर, भालचंद्र नेमाडे इ. कादंबरीकारांचे लेखन अनन्यसाधारण आहे. केवळ साहित्याची कलात्मक बांधणी या साहित्यिकांनी केली नाही तर सर्वसाधारण माणसांच्या मनाला जाऊन भिडणारा आशय त्यांच्या कादंबऱ्यांमध्ये आढळतो. सामाजिक बांधिलकीच्या पलीकडे जाऊन अपरिचित वास्तव त्यांनी आपल्या साहित्यातून रेखाटले आहे. सामाजिक आणि मानवी मूल्यांपासून हे साहित्य कधी दूर गेले नाही. या काळात निर्माण झालेली कादंबरीही वेगळा आशय पेलताना दिसते. जीवनाबद्दलचे वाढते कुतूहल तिच्यात निर्माण झाले. एखाद्या विषयावर कादंबरी लिहिण्यापेक्षा प्रत्यक्ष जीवनानुभवाचाच कलात्मक अविष्कार करण्याकडेच तिचा कल आहे. माणसांचे स्वतः शी, इतरांशी आणि निसर्गाशी असलेले संबंध अधिक नेटकेपणाने या कादंबरीतून अवतरतात. जीवनातील गुंतागुंतीची व्यामिश्रतेची जाणीव अधिक तीव्र असल्याचे लक्षात येते...... साक्षात जीवनावर होणाऱ्या बऱ्यावाईट परिणामांची दाखल ते तितक्याच तीव्रतेने कादंबऱ्यांतून आविष्कृत करतात.फ्फ७ अशया विविध आशयविषय असलेल्या कादंबऱ्यांतून मानवी मूल्यांची जोपासना होऊ लागली.

नेमाड्यांच्या 'कोसला' , 'बिढार' यासारख्या कादंबऱ्यांत माणसांच्या आंतरिक अवस्थेवर जीवनावरप्रकाश टाकण्यात आला आहे. ''माणसांची स्खलनशीलता लेखनातून पुनः पुन्हा जाणवून दिली जाते.अर्थशून्यता, भ्रमनिरास आणि एकाकीपणा यांचा सूर त्यांना आकर्षित करतो, कारण भोवतालचे वास्तवाचं असे झाल्याचे पुनः पुन्हा प्रत्ययाला येत असते. आजचा माणूस समूहामध्ये, गर्दीमध्ये आपला चेहराच हरवून बसला आहे. त्याचा निश्चित केंद्रबिंदू (fixed point) नाहीसा झाला आहे. त्याचे सत्त्व आणि माणूसपण या विश्वव्यापारात हरवू लागले आहे. असे त्यांना वाटते.''[८] या हरवलेल्या माणसांचा शोध नेमाडे आपल्या कादंबऱ्यांत घेतात. भाऊ पाध्ये यांच्या 'वैतागवाडी', 'होमसिक ब्रिगेड', 'वासूनाका' इत्यादी कादंबऱ्यांतून मानवी विश्व समोर येताना दिसते.

जयवंत दळवी, चंद्रकांत खोत, किरण नगरकर हा.मो. मराठे, स्त्री लेखिकांमध्ये सानिया, आशा बगे, प्रभा गणोरकर विजया राजाध्यक्ष, डॉ.आशा सावदेकर इ. साहित्यिकांचे लेखन मानवतावादी मूल्यांचा पुरस्कार करणारे आहे.

मराठी कथेतील मानवतावादी दृष्टिकोन अगदी उघड आहे. नवकथाकारांच्या पिढीतील महत्त्वाचे कथाकार म्हणजे वामनराव

चोरघडे, अरविंद गोखले, गंगाधर गाडगीळ, पु. भा. भावे, व्यंकटेश माडगूळकर यांच्या कथांमधून मानवी विश्व समोर येते.

त्यानंतर जी. ए. कुलकर्णी, दिलीप चित्रे यासारख्या अस्तित्ववादी अंगाने लेखन करणाऱ्या कथाकारांच्या कथांमधून मानवतावादी मूल्ये ठळकपणे जाणवते. ''मराठी कथा वाचताना निश्चितपणे असे वाटते की, मराठी कथा दर्जेदार व समृद्ध आहे. इतर वाङ्मयप्रकारांच्या तुलनेत मराठी कथेचा प्रवाह व भावनांचे गहिरेपण,स्वभावाची व्यामिश्रता दाखवून माणसांच्या जीवनाबद्दलच्या जाणिवा समृद्ध केल्या आहेत. काही कथाकारांनी एकूण जीवनाबद्दल मूलभूत प्रश्न उभे करून कथेला उंची दिली आहे.''[१] म्हणूनच मराठी कथा अधिक प्रभावीपणे मानवतावादी मूल्यांचा पुरस्कार करणारी ठरते.

अलीकडच्या साहित्यिकांमध्ये सदानंद देशमुख, आसाराम लोमटे, मेघना पेठे, कविता महाजन, इत्यादींची मानवतावादी साहित्याचा पुरस्कार साहित्यिक म्हणून नोंद घेता येते.

**समारोप/निष्कर्ष :**

१. संपूर्ण मराठी साहित्याचे खऱ्या अर्थाने रूप पालटले ते दुसऱ्या महायुद्धानंतर आणि आधुनिक युगात मानवाला महत्त्व देणारे साहित्य निर्माण लागले. जागतिकीकरणाच्या भ्रमिष्ट अवस्थेत मानवाच्या अस्तित्वाच्या मुळाशी रुंजी घालणारे साहित्य प्रभावदर्शी ठरले.

२. मानवी मूल्यांची पूजा करणाऱ्या साहित्याने जागतिक साहित्यात मराठी साहित्याची प्रतिमा उंचावली खरी पण मराठी भाषेच्या प्रांतीय बंधनामुळे मराठी भाषा जागतिक पातळीवर ठसा उमटवू शकली नाही. पण यापेक्षा मराठी भाषेच्या वाचकांची अभिरुची आणि आवड तसेच साहित्याकडे परंपरागत दृष्टिकोनातून बघण्याची तऱ्हा बदलविण्यात तिला निश्चितच यश आले हे नाकारता येत नाही.

३. मराठी साहित्याचे स्वरूप काही वेळा रंजनवादी, कलावादी, उपाहासपर, काल्पनिक असेलही, पण मानवतावादाचे अनुयायित्व त्याने कधी सोडले नाही. धावपळीच्या, गुंतागुंतीच्या, विज्ञानाच्या आणि परात्मतेच्या वातावरणात फक्त 'माणूस' हाच लेखनाचा,विचाराचा, मंथनाचा विषय असला पाहिजे अशा वैचारिकतेची सुरुवात दुसऱ्या महायुद्धानंतर मराठी साहित्यात झालेली दिसते.

मराठी साहित्यात मानवतावादी दृष्टिकोनाचा परीघ हा उत्तोरोत्तर वाढतच गेला व आजही याच मानवतावादाला केंद्र मानून मराठी साहित्याची अखंडित वाटचाल सुरू आहे.अलीकडील प्रवीण बांदेकर, नामदेव कोळी, कविता मुरुमकर, पी. विठ्ठल इ. कवींच्या कविता काळाने प्रभावित झालेल्या आहेत. जगण्यासंदर्भातील मूलभूत प्रश्नांची उकल या कविता करताना दिसतात. नंदा खरे यांची 'उद्या' ही कादंबरी मानवी अस्तित्वाचा अपहरण होण्याच्या प्रक्रियेचा सूतोवाच करणारी आहे.एकूणच मराठी साहित्य परंपरागततेतून मुक्त होऊन वैश्विक होत आहे.

**संदर्भ ग्रंथ सूची :**


१. डॉ. अक्षयकुमार काळे : अर्वाचीन मराठी काव्यग्रंथ, वनहट्टी प्रकाशन, नागपूर प्र.आ. १९९९,पृ.क्र. २४

२. वा.भ. बोरकर, शंकर वैद्य (संपा ) : रसयात्रा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. पुनर्मुद्रण २०१३ पृ.क्र. १०

३. डॉ. अक्षयकुमार काळे : मर्ढेकरांची कविता: आकलन, आस्वाद आणि चिकित्सा, विजय प्रकाशन, नागपूर पृ. क्र. १००-१०१

४. शरच्चन्द्र मुक्तिबोध : श्रुष्टि, साहित्य आणि सौन्दर्यमूल्ये पृ. क्र. १४८.

५. गंगाधर गाडगीळ : 'खडक आणि पाणी', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, दु. आ. १९६६,पृ.क्र. ९९.

६. भालचंद्र फडके (संपा.): 'सहा कथाकार', कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, चवथी आ. २००२ पृ . क्र. ४७.

७. अ.आ . कुलकर्णी (संपा ) : 'प्रदक्षिणा' खंड -२, 'स्वातंत्र्योत्तर मराठी कादंबरी : प्रवृत्ती आणि प्रवाह', अविनाश सप्रे,कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे १९९१, पृ. क्र . १६५.

८. तत्रैव : २२३.

९. गो.मा. पवार, म. द . हातकणंगलेकर. (संपा.): 'मराठी साहित्य : प्रेरणा व स्वरूप', कथा म चंद्रकांत बांदिवडेकर, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई प्र. आ. १९८६ पृ. क्र. १८२-१८३.


■■■

UGC CARE LISTED
ISSN No. 2394-5990

## इतिहासाचार्य वि. का. राजवाडे मंडळ, धुळे
## या संस्थेचे त्रैमासिक

# ।। संशोधक ।।

पुरवणी अंक १३ – डिसेंबर २०२२ (त्रैमासिक)

- शके १९४४ • वर्ष : ९० • पुरवणी अंक : १३

संपादक मंडळ

- प्राचार्य डॉ. सर्जेराव भामरे • प्रा. डॉ. मृदुला वर्मा • प्रा. श्रीपाद नांदेडकर

* प्रकाशक *

**श्री. संजय मुंदडा**

कार्याध्यक्ष, इ. वि. का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे ४२४००१

दूरध्वनी (०२५६२) २३३८४८, ९४०४५७७०२०

**कार्यालयीन वेळ**

सकाळी ९.३० ते १.००, सायंकाळी ४.३० ते ८.०० (रविवारी सुट्टी)

मूल्य रु. १००/-

वार्षिक वर्गणी रु. ५००/-, आजीव वर्गणी रु. ५०००/- (१४ वर्षे)

**विशेष सूचना :** संशोधक त्रैमासिकाची वर्गणी चेक/ड्राफ्टने 'संशोधक त्रैमासिक राजवाडे मंडळ, धुळे' या नावाने पाठवावी.

**अक्षरजुळणी :** सौ. सीमा शिंत्रे, वारजे-माळवाडी, पुणे ५८.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकेच्या प्रकाशनार्थ अनुदान दिले आहे. या नियतकालिकेतील लेखकांच्या विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.

२९. **Use of Social Media Tools in Academic Libraries**
- Mr. Amalendu Santra ---------- १५६

३०. **One Party Dominance to Yuti Government in Maharashtra**
- Dr. Kamlakar N. Rakshase ---------- १६०

३१. ***Quantifying Land Use and Land Cover Changes in Netravali Wildlife Sanctuary: An Integrated Remote Sensing and GIS Approach***
- Sumata Suraj Naik Shetkar, F. M. Nadaf ---------- १६३

३२. **Reflection of Humanism in Shri. Siddharameshwar's Vachana Literature**
- Santosh Basavantrao Patil ---------- १७३

३३. **A Study of Economic Empowerment of Women through Self-Help Groups in India**
- Dr. Dattatraya Shivaji Thorat ---------- १७६

३४. माहिती तंत्रज्ञानाच्या युगात शहर विकास प्रशासनातील नगराध्यक्षाची भूमिका
- प्रा.डॉ.सिद्राम सलवदे, प्रा.विलासराव पांडूरंग लवटे ---------- १८२

३५. ऐतिहासिक पर्यटन आणि महाराष्ट्रातील निवडक गड-किल्ले
- प्रांजली आत्मलिंग शहाणे, डॉ. तानाजी जनार्दन फुलारी ---------- १८६

३६. ग्रामीण जीवन कवीमनातील शेतकरी
- प्रा. संजय रावसाहेब चव्हाण ---------- १९१

३७. छत्रपती शिवाजी महाराज यांचे अष्टप्रधान मंडळ व प्रशासन व्यवस्था
- डॉ. लोकेशकुमार ह. नंदेश्वर ---------- १९४

३८. बँकिंग क्षेत्रामधील नवीन ट्रेन्ड: ग्रीन बँकिंग
- प्रा. डॉ. के. पी. वाघमारे ---------- १९८

३९. संत वाङ्मय : प्रबोधनाची अक्षय्य परंपरा
- प्रा. डॉ . विजय रुपराव राऊत ---------- २०१

४०. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक न्यायातील योगदान
- प्रा. डॉ. दिलीप घोंगडे ---------- २०४

४१. छत्रपती शिवाजी महाराज : १७ व्या शतकातील प्रखर राजकीय स्वाभिमानी नेतृत्व
- प्रा.डॉ.एम.जी.मोरे ---------- २०९

४२. ताराबाई मोडक
- डॉ उर्मिला क्षीरसागर ---------- २१२

ISSN No. 2394-5990

# संत वाङ्मय : प्रबोधनाची अक्षय्य परंपरा

**प्रा. डॉ . विजय रुपराव राऊत**
सहयोगी प्राध्यापक,मराठी विभाग
श्री पंढरीनाथ कला वाणिज्य महाविद्यालय,
नरखेड जि. नागपूर,
इमेल : parambiraut@gmail.com

**सारांश :**

स्थळ, काळ व परिस्थितीचा विचार केला तर संतकालीन परिस्थिती आणि सद्य परिस्थितीत फार मोठी तफावत निदर्शनास येते. पण तरीही संतांचे विचार अक्षय्य ठरतात याचे महत्त्वाचे कारण त्यांची सामाजिक जाणीवेतील संवेदनशीलता, मानवी आकलन व त्यांच्या ठाई असलेली कालातीत दृष्टी होय. आज आपण कितीही विकसित, यांत्रिक आणि तंत्रस्नेही झालो असलो तरीही संतांनी अधोरेखित केलेल्या मुद्द्यांना टाळून आपला प्रवास सहज शक्य होणार नाही. संतांनी फक्त वर्तमानाचा विचार केला नाही तर मानवी प्रवासात त्याला पुरेशी शिदोरी सुद्धा त्यांनी आपल्या अभंगात बांधून दिलेली आहे. सहस्र वर्षापासून चालत आलेली संतांच्या प्रबोधनाची आणि मार्गदर्शनाची परंपरा आजही याच कारणाने टिकून आहे.

**प्रस्तावना :**

भारत भूमीला संतांची समृद्ध अशी परंपरा लाभलेली आहे. संतांनी आपल्या ग्रंथातील तत्वज्ञानातून सामाजिक अभ्युदयाचा ध्यास धरला आणि महत्त्वाचे म्हणजे संतांच्या या ग्रंथ वाङ्मयातून व्यक्त होणारे तत्त्वज्ञान कालातीत ठरते याचे कारण संतांची दूरदृष्टी होय. महाराष्ट्र देश तर संतांची पुण्यभूमीच होय. संत ज्ञानेश्वरांपासून संत नामदेव. चोखोबा, सावता माळी, गोरोबा, विसोबा खेचर सेनान्हावी ,कानोपात्रा येथून तर १६ व्या शतकातील आलो याच कारणाशी बोलले जे ऋषीमुनी असे ठणकावून सांगत आडराणाने भरले जग सद्मार्गाने लावणे हेच आमच्या येण्याची प्रयोजन आहे असे जाहीरपणे सांगणाऱ्या जगद्गुरु तुकारामापर्यंत ही परंपरा खंडित अव्याहत सुरू होती. पुढे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज व अवघ्या महाराष्ट्राला गोपाला गोपाला देवकीनंदन गोपाला असे म्हणून स्वच्छतेचे धडे व अंधश्रद्धेच्या विळख्यात सापडलेल्या समाजाला विज्ञानाची व आधुनिकतेची दीक्षा देणारे महान संत गाडगे महाराज आज या महान कर्मयोगी माणसांच्या कर्मशीलतेची व कालातीत विचारांची उपयोगिता पटवून देण्याचा प्रयत्न प्रस्तुत शोधनिबंधातून करण्यात येणार आहे.

श्री संत ज्ञानेश्वर महाराजांनी आपल्या गुरुला अत्यंत मनोभावे मागितलेले हे पसायदान तब्बल ८०० वर्षानंतरही नित्य नूतन असल्याचे जाणवते. संत ज्ञानेश्वरांच्या व्यक्तिमत्वात अनुस्युत कालातीत दृष्टीचा हा प्रभाव आहे.

**"जे खळांची व्यंकटी सांडो। तया सत्कर्मी रती वाढो**
**भूता परस्परे जडो । मैत्र जिवांचे"**

ज्ञानेश्वरांच्या आदर्श समाज रचनेचे उदात्त उद्दिष्ट होते. आदर्श गुरु होण्यासाठी आदर्श शिष्य प्रथम व्हावे लागते त्याप्रमाणे त्यांच्या मनात समाजोद्धाराची ज्योत सतत प्रज्वलित असावी लागते म्हणूनच मांगल्यपूर्ण विश्वधर्माचे चालते बोलते प्रतीक म्हणजे हा गुरु असतो.

गुरूच दुर्जनांना सज्जनात रूपांतर करण्याची किमया करू शकतात. शिक्षणाच्या द्वारा दुर्जनांना नामशेष करायचे नाहीत तर त्यांची सज्जनात रूपांतर करावयाचे हा पसायदानाचा मूलभूत संदेश आजच्या लोकसत्ताक जीवनपद्धतीलाही अचूक मार्गदर्शन करण्यास पुरेपूर समर्थ आहे किंबहुना आजही या पसायदानाची उपयोगिता अबाधित आहे असे म्हणावयाला हरकत नाही; असे सद्य परिस्थितीच्या आकलनानंतर ध्यानात येते. असे अक्षर वाङ्मयतत्व,अक्षर विचार समाजाला देण्याची क्षमता संतांच्या लेखणीत होती.

संत ज्ञानेश्वरांनी संपूर्ण ज्ञानेश्वरीत तत्त्वज्ञान सांगितले ते मानवाच्या शारीरिक व मानसिक उन्नतीकरीता उपकारक असेच आहे.

**"हे विश्वची माझे घर। ऐसी मती जयाची स्थिर।।**
**किंबहुना चराचर ।आपणची झाला ।।"**

असे विचार बाराव्या शतकापेक्षा आजच्या खंडित होत चाललेल्या काळात अधिक सुसंगत आणि परिणामकारक आहेत याची जाणीव झाल्याशिवाय राहत नाही. आज आपण घराच्या बाहेर पडतो तो एक परात्म भाव मनात घेऊनच.बाहेरच्या जगात आपण स्वतःला असुरक्षित समजत असतो या कारणाने माणूस एकमेकांविषयी कलुशीत भावनेने विचार करतो व वागतो; म्हणून 'हे विश्वची माझे घर' असा विचार मनात घेऊन निघालो

तर कदाचित कुठे परात्मकता दिसणार नाही. मला वाटते ज्ञानेश्वरांच्या विचारातील ही अक्षय्य मूलतत्त्व अन्यत्र दिसू शकत नाही. ही संतांच्या लेखणीची महत्त्वाची आणि तितकीच मराठीला उंचीवर नेऊन ठेवणारी बाब आहे हे ध्यानात आल्याशिवाय राहत नाही. दुसरी गोष्ट अशी की, आपण बाहेरच्या जगाला आपलं घर समजत नाही बेगुमान वागणे, बाहेर केरकचरा करणे,शिवीगाळ करणे दुसऱ्याला परकेपणाची वागणूक देणे या नित्याच्या गोष्टी होऊन गेलेल्या आहेत.आपले तसे दुसऱ्याचे हा भाव येथे महत्त्वाचा असणे आवश्यक आहे. त्याशिवाय हे विश्व आपले घर कधीच होऊ शकत नाही. 'वसुधैव कुटुंबकम' ही संकल्पना साकार होऊ शकणार नाही.

संत ज्ञानेश्वर महाराज मराठी चे गोडवे गाताना म्हणतात की, ''माझ्या मराठीची बोलू कवतीके। परी अमृतातेही पैजा जिंके'' आज मराठी भाषेची होणारी पीछेहाट व अवनती बघता असे लक्षात येते की, संत ज्ञानेश्वर महाराज ज्या मराठीचा कौतुकाने उल्लेख करून अमृत सुद्धा मराठीच्या तुलनेत कमी गोड असेल अशी ही मराठी आज इतर भाषेच्या आक्रमणाने व मराठी भाषकाच्या अंगी असलेल्या परकीय भाषेच्या आकर्षणाच्या वेडेजापणामुळे मराठी भाषेची अधोगती असल्याचे स्पष्ट जाणवते. आपल्या मातृभाषेतून संवाद साधने किती परमानंद देणारे आहे व त्यात किती गोडवा साठवलेला आहे याची कल्पना संत ज्ञानेश्वर महाराजांना होती.आज मराठी भाषा जगविणे आणि तिला वैश्विक करणे निसंशय आपले कर्तव्य ठरते.

संत तुकाराम महाराजांच्या अभंगातील कालातीत विचारांचा मागोवा घेणे या ठिकाणी विषयपूरक ठरेल.

''परोपकारी नेने परनिंदा, परस्त्रीया सदा बहिणी माया
भूतदया गाई पशुंचे पालन, तान्हेल्या जीवन वनामाजी
शांतीरुपे नव्हे कोणाचा वाईट, वाढवी महत्त्व वडिलांचे''

आजच्या समाजातील अराजकता,परात्मता,स्वार्थीपणा या सर्वांवर सोळाव्या शतकातच संत तुकाराम महाराज भाष्य करून जातात. असे स्थलकालातील विचार संत वाङ्मयाचे बलस्थान आहे. वाटेल त्या प्रकाराने अधिक पैसा मिळविणे अधिक भोग भोगणे पैशाच्या जोरावर उन्नतपणा करणे व दुसऱ्याचा छळ करणे या प्रवृत्तीस पायबंद बसला पाहिजे म्हणून उत्तम व्यवहार करून चांगल्या मार्गाने व प्रामाणिकपणाने धन मिळवण्यास संतांनी प्रापंचिकांना सवलत दिली आहे.' संतांच्या या अक्षय्य विचारांचा उगम त्यांच्या दूरदृष्टीतून होतो. संतापुढे मानवी जीवनाचे समग्र रूप उभे होते म्हणूनच आपल्या विचारांना त्यांनी क्षीणता येऊ दिली नाही. संपूर्ण मानव जातीवर थोर संस्कार घडवून आणण्याची त्यांची महत्त्वकांक्षा होती 'एकमेका सहाय्य करू अवघे धरू सुपंथ' ही संतांची शिकवण आजच्या काळात गरज आहे. प्राध्यापक गं.बा.सरदार म्हणतात त्याप्रमाणे, ज्या नैतिक मूल्यांच्या द्वारे समाजाचा उत्कर्ष होतो त्यांचे महत्त्व लोकांच्या मनात बिंबविण्याची त्यांची खटपट होती.' ती सगळी मुल्ये तुकारामांनी आपल्या अभंगातून जनमानसाच्या मार्गक्रमासाठी पेरलेली दिसते.

संत रामदासांचे,

उत्कट भव्य घ्यावे मिळमिळीत अवघेची टाकावे,
निस्पृहपणे विख्यात व्हावे । भू मंडळी

हे उदात्त विचार आजच्या कीड लागलेल्या समाजास आणि दुरावस्थेला पोहोचलेल्या नवीन पिढीच्या अवस्थेला आणि वागणुकीला तंतोतंत जुळतात. अशा प्रबोधनपर सुभाषितांनी आजच्या समाजमनाचे निश्चितपणे उद्बोधन होत आहे. तसेच ङ्गसामर्थ्य आहे चळवळीचे, जो जो करील तयांचेफ हे रामदासांचे विचार संघटन एकता निर्माण करणारे आहेत. दहशतवाद, फसवणूक, भ्रष्टाचार या दुष्ट शक्तींशी लढण्यासाठी आवश्यक ठरतात. संत नामदेवांनी समाजाकरिता पाथेय दिलेले आहे. आपल्या तीर्थाटनातून मिळवलेले ज्ञान व त्यातून आलेली विचारांची परिपक्वता याचा उपयोग त्यांनी कीर्तनाच्या माध्यमातून समाज प्रबोधन करण्याकरिता केलेला आहे.

''खाटीका प्रमाणे करिती व्यापार मनी निरंतर धरूनिया
दुष्टदुराचारी दुर्बल घातकी परमनाश की पापिष्ट तो''

अशा दुष्ट दुराचारी वर्तनाला दुरुस्त करण्याचे त्यांचे कार्य भूतदयावादाचा प्रत्यय घडून आणणारे आहे.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे विचार अगदी आजच्या परिस्थितीला समांतर जाताना दिसतात. आज शहरांचा वाढता आकार व दुसरीकडे ओस पडत चाललेली खेडी हे चित्र बघायला मिळते आहे. खेड्यांची दुर्दशा कमालीची विकोपाला गेलेली दिसते आहे. तुकडोजी महाराजांनी ग्रामगीतेत गावाच्या संगोपनाची भूमिका घेतलेली आहे. आज देशाला मोठे करायचे असेल तर खेडी जगवली पाहिजे शेतकरी जगवला पाहिजे अशी महाराजांची भूमिका होती. सामाजिक- आर्थिक असमानतेची कारणे आणि उपायही राष्ट्रसंतांनी आपल्या ग्रामगीतेत मांडलेले आहेत. देशभक्ती, समाजसुधारणा, अनिष्ट रूढी निर्मूलन, दलीतोद्धार, गोरक्षण, समाज संघटन, ग्रामीण शेती सुधार, स्त्रीमुक्ती, व्यायामाचे व शरीर श्रमाचे महत्त्व, व्यसनमुक्ती आणि सर्वांगीण स्वावलंबनात्मक ग्रामोद्धार हे तुकडोजी महाराजांचे विचार आजही कालबाह्य झालेले नाही याचा प्रत्यय आपणा सर्वांना येतोच आहे.

ISSN No. 2394-5990



**"या भारतात बंधुभाव नित्य वसु दे, दे वरची असा दे
हे सर्व पंथ संप्रदाय एक दिसू दे, मतभेद नसू दे"**

आजच्या २१ व्या शतकात भारतातील बंधुभाव लोप पावल्यासारखा वाटतो आहे माणसा माणसात फूट पाडणाऱ्यांना, द्वेष पसरविणाऱ्यांना तसेच कश्मीर सारख्या नंदनवनाला निर्जन करणाऱ्या विचारशक्तींना राष्ट्रसंतांच्या राष्ट्रभक्तीचे बाळकडू पाजणे अत्यावश्यक आहे.

संत गाडगे महाराजांची कृतिशीलता उल्लेखनीय आहे; आधी स्वतः हातात झाडू घेऊन गाव स्वच्छ करण्याची मोहीम स्वतःपासून सुरू केली. गावोगाव हिंडून आपल्या भजन आणि कीर्तनातून समाजाला नवीन दिशा देणाऱ्या विचाराची अपूर्वता समाज सुधारक गाडगेबाबांच्या व्यक्तिमत्त्वात होती. आज महाराष्ट्र सरकारने त्यांच्याच कार्याचा वसा आणि प्रेरणा घेऊन 'संत गाडगे बाबा ग्राम स्वच्छता अभियान' म्हणून राबवित आहे. एकंदरीत आपण असे म्हणू शकतो की संतांच्या विचारासोबत गेल्याशिवाय मानवी जीवनाचे साध्य कधीच पूर्ण होऊ शकत नाही. विसाव्या शतकात वैज्ञानिकांना ज्या अध्यात्माचा व संत साहित्याचा आधार वाटला त्यांना तो २१च्या शतकात वाटणार नाही असं म्हणून तर्कसंगत वाटत नाही. उलट सामाजिक नी वैश्विक संतुलन साधण्यासाठी विविध धर्मातील संत साहित्यात उपयुक्त ठरणार आहे कारण नवनव्या परिस्थितीत आव्हानात ताणतणावात मनःशांती मिळण्यासाठी हे साहित्यच आजवर साधनभूत ठरलं आहे.[३] म्हणूनच संत आणि त्यांचे विचार सोबत घेऊनच मानवाला आपला जीवनप्रवास करणे अगत्याचे आहे.

**समारोप :**

एकंदरीत संत साहित्यातून मूलभूत लक्ष्य केंद्रित केलेले दिसते. देव -धर्म या पलीकडे जाऊन समाजमनाचे उन्नयन करण्याचे सामर्थ्य त्यांच्या विचारात होते; किंबहुना आजही त्यांचे विचार तितकेच प्रभावदर्शी आहेत. व्यक्तीबरोबर समष्टीचा उद्धार हे संतांच्या कार्याची खऱ्या अर्थाने फलश्रुती ठरते. संत हे समाजाचे दीपस्तंभ होते. ते भविष्यवेत्ते होते पण त्यांची कृतीशीलता आणि वैचारिकता पेलण्यास आपण असमर्थ ठरत आहोत की काय असा प्रश्न सहज निर्माण होतो. त्यांनी रुजवलेली उदात्तता परोपकार, भूतदया इत्यादी मूल्य आज हरवलेली दिसत असली तरीही संतवाङ्मयातून ती अक्षय्य होऊन आपल्याला मार्गदर्शक ठरत आहे. समाजसुधारणा, अंधश्रद्धा ,पर्यावरण इत्यादीविषयीचे संतांचे अक्षय्य विचार आजच्या युगात मानवी कल्याणास उपयोगी आहेत एवढे मात्र ठामपणे आपल्याला म्हणता येईल.

**निष्कर्ष :**

१) महाराष्ट्रातील संत विचारपरंपरेत समाजभान हे महत्त्वाचे तत्व आढळून येते.

२) त्यांच्या ठाई असलेल्या सूक्ष्म निरीक्षण शक्तीमुळे व भविष्याचा वेध घेण्याची बुद्धिगत्ता असल्यामुळे त्यांचे विचार हे भविष्याचा वेध घेणारे ठरते.

३) त्यांच्या अभंग वाणीतून निवेदित झालेले अक्षय्य तत्व म्हणजे सर्व काळात उपयोगी पडणारे विचार हे होय.

४) संतांच्या वाणीतून प्रस्तुत झालेले विचार हे संपूर्ण मानव जाती करिता सदैव मार्गदर्शक असेच आहे.

**संदर्भ ग्रंथ सूची :**


१. पिंगे श्री म, माळी गजमल : म तुकारामांचे निवडक शंभर अभंग म, व्हीनस प्रकाशन पुणे, चौथी आवृत्ती १९९४ प्रस्तावना पृ. क्र.२९

२. सरदार गं. बा.: म संत वाङ्मयाची सामाजिक फलश्रुती म, लोकवाङ्मय गृह, मुंबई, चौथी आवृत्ती १९८२,पृ.क्र.११०

३. पठाण यू. म.: म मध्ययुगीन संतसाहित्य : काही आयाम म, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, आवृत्ती पहिली २००३ पृ. क्र.१३९/१४०

मूळ अभ्यासग्रंथ :

- ग्रामगिता
- तुकारामांची गाथा
- प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास


■■■

UGC CARE LISTED
ISSN No. 2394-5990

# इतिहासाचार्य वि. का. राजवाडे मंडळ, धुळे
## या संस्थेचे त्रैमासिक

# ।। संशोधक ।।

पुरवणी अंक २ – जून २०२३ (त्रैमासिक)

- शके १९४५
- वर्ष : ९१
- पुरवणी अंक : २

संपादक मंडळ

- प्राचार्य डॉ. सर्जेराव भामरे
- प्राचार्य डॉ. अनिल माणिक बैसाणे
- प्रा. डॉ. मृदुला वर्मा
- प्रा. श्रीपाद नांदेडकर

अतिथी संपादक

- प्राचार्य डॉ. प्रकाश पवार
- सहा. प्रा. विजय रहांगडाले

* प्रकाशक *

**श्री. संजय मुंदडा**

कार्याध्यक्ष, इ. वि. का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे ४२४००१
दूरध्वनी (०२५६२) २३३८४८, ९४२२२८९४७१, ९४०४५७७०२०

**कार्यालयीन वेळ**

सकाळी ९.३० ते १.००, सायंकाळी ४.३० ते ८.०० (रविवारी सुट्टी)

मूल्य रु. १००/-
वार्षिक वर्गणी रु. ५००/-, आजीव वर्गणी रु. ५०००/- (१४ वर्षे)

**विशेष सूचना :** संशोधक त्रैमासिकाची वर्गणी चेक/ड्राफ्टने 'संशोधक त्रैमासिक राजवाडे मंडळ, धुळे' या नावाने पाठवावी.

**अक्षरजुळणी :** सौ. सीमा शिंत्रे, वारजे-माळवाडी, पुणे ५८.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकेच्या प्रकाशनार्थ अनुदान दिले आहे.
या नियतकालिकेतील लेखकांच्या विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.

२३. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण – २०२० व भारतीय भाषा, कला व संस्कृती ---------- १०१
- डॉ. वंदना एच. तागडे

२४. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण : मातृभाषेला मिळालेली संजीवनी ---------- १०५
-डॉ.विजय रूपराव राऊत

२५. वैश्विक परिप्रेक्षात प्राचीन भारतीय ज्ञान व सर्जनशिलतेचा विकास इ. स. ३०० ते ७०० ---------- १०८
-डॉ. विशाल अ. दौलतकर

२६. आत्मनिर्भर भारत आणि स्वामी विवेकानंद यांच्या तत्वज्ञानाची प्रासंगिकता ---------- ११३
-Prof. Dr.Dipak M.Chavan

२७. जागतिक आर्थिक मंदीचा भारतीय अर्थव्यवस्थेवर परिणाम ---------- ११७
- Dr. Shankar R.Gujarkar

२८. भारतातील आदिवासी लोकसंख्या आणि सार्वजनिक आरोग्याची आव्हाने व भवितव्य: महाराष्ट्राच्या विशेष संदर्भात ---------- १२०
-किशोर भाऊराव मेंढे, डॉ. समीत लक्ष्मण माहोरे

२९. चंद्रपूर शहरातील स्थानिक स्वराज्य संस्थेतील सफाई कामगारांच्या समस्या ---------- १३०
- श्री. पीपल मोरेश्वर खोब्रागडे, प्राचार्य डॉ. डी. टी. गजभिये

३०. कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांच्या नेतृत्वाखालील भूमिहिनांच्या सत्याग्रहातील महिलांचे योगदान ---------- १३४
- प्रा. डॉ. राजेश पी. कांबळे, प्रा. प्रदिप रामभाऊ लोहकरे

३१. रससिद्धांताबाबत शरच्चंद्र मुक्तिबोधांचे विचार ---------- १३९
- प्रा. प्रमोद नारायणे

३२. राष्ट्रीय शिक्षण धोरण –२०२० स्वातंत्र्य भारताचे स्वावलंबन आणि विश्वगुरु ---------- १४४
- प्रा.प्रमोदिनी ज्ञा.खोरगडे (सातंगे)

ISSN No. 2394-5990

# नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण : मातृभाषेला मिळालेली संजीवनी

डॉ.विजय रूपराव राऊत
सहयोगी प्राध्यापक, मराठी प्राध्यापक
श्री पंढरीनाथ कला- वाणिज्य महाविद्यलाय, नरखेड
इमेल- parambiraut@gmail.com मोबा. ९८५०२३६८७९

**प्रस्तावना :**

काळानुसार, गरजेनुसार बदल आत्मसात करणे अगत्याचे असते. काळानुसार जगातील अनेक घटकांची स्थिती बदललेली असते. त्यामुळे त्याला समजून घेण्याकरिता नव्या सूत्रांची, शास्त्राची, संहितेची, सिद्धांताची अवश्यकता अपरिहार्य असते. या अपरिहार्यतेतून नव्या शिक्षणाचा जन्म होत असतो. आजच्या तंत्रज्ञानाच्या विशाल गुंतागुंतीच्या जगात त्याच तोलामोलाचे किंबहुना त्याला समजून घेऊन काळाच्या हातात हात घालून भ्रमंती करायला लावणारे शिक्षण अत्यावश्यक झालेले आहे. जगातील प्रत्येक देश आपापल्यापरीने या आधुनिकतेला सामोरे जाण्याचा प्रयत्न करीत आहे. त्यासाठी पहिले अग्रक्रमाचे काम म्हणजे मूलभूत शिक्षणात बदल घडवून देशाच्या नव्या पिढीला सक्षम करणे आवश्यक ठरते. शिक्षण हे एक असे शस्त्र आहे की, ज्यामुळे तुम्ही जगात बदल घडवू शकता. म्हणून भारत सरकारनेही भारतीय शिक्षणात काळाची गरज म्हणून वेळोवेळी बदल केलेला आहे. भारतात प्रथम १९६८ मध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरण अस्तित्वात आले. त्यानंतर १९८६ मध्ये ते आले. त्यात पुन्हा १९९२ मध्ये त्यात काही सुधारणा केल्या गेल्या. त्यानंतर तब्बल ३५ वर्षानंतर २९ जुलै २०२० केंद्राने नवीन शैक्षणिक धोरण स्वीकारले आहे. त्या धोरणात मातृभाषेला किती महत्त्व दिलेले आहे आणि त्यातून काय साध्य होणार आहे याची उकल करण्याचा प्रयत्न प्रस्तुत शोधनिबंधातून केलेला आहे.

**सारांश (Abstract) :**

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० हे पूर्णतः विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अभिनव असे पाऊल आहे. यात सर्वगुणकलासंपन्न असा विद्यार्थी डोळ्यासमोर ठेऊन आणि वर्तमान परिस्थितीला केंद्रस्थानी ठेऊन हा कृतिआराखडा तयार केलेला आहे. पण याचबरोबर हे नवीन शैक्षणिक धोरण अनेक मूलभूत सामाजिक घटकावयवांचे पुनरोत्थान करणारे असे आहे. भारतीय भाषेच्या संवर्धनाकरिता अतिशय उपयोगी असे हे धोरण मातृभाषेला महत्त्व अधोरेखित करणारे आणि संस्कृतचे जतन करणारे असे ठरते. प्रत्येक प्रदेशातील बोलीभाषा आणि प्रमुख भाषा यामध्ये अनुत्सुत असलेले ज्ञानभंडार यानिमित्ताने जपले जाईल यात शंका नाही. त्याचबरोबर अल्पवयीन विद्यार्थ्यांमध्ये वाढत चाललेली शिक्षणाविषयीची भीती आणि अनास्था यानिमित्ताने काही प्रमाणात दूर होऊ शकेल.या सर्व शक्यतांचा विचार केल्यास नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची फलश्रुती सहज लक्षात येण्यासारखी आहे.

**बीजशब्द (key words) :** मातृभाषा, शिक्षण

**नवीन शैक्षणिक धोरणाची गरज :**

या धोरणाची आवश्यकता मुळात एकविसावे व त्यापुढील शतक आणि त्यातील आव्हाने पेलण्याची क्षमता युवा पिढीत निर्माण करणे हेच आहे. ''एकविसाव्या शतकाच्या गरजा लक्षात घेता, चांगल्या विचारवंत, अष्टपैलू आणि कल्पक व्यक्ती विकसित करणे हे दर्जेदार उच्च शिक्षणाचे उद्दिष्ट असले पाहिजे. यात एखाद्या व्यक्तीला एक किंवा अनेक विशिष्ट आवडीच्या क्षेत्रामध्ये सखोल अभ्यास करणे शक्य झाले पाहिजे.तसेच चारित्र्यविषयक, नैतिक आणि घटनात्मक मूल्ये, बौद्धिक कुतूहल, वैज्ञानिक स्वभावधर्म, कल्पकता, आणि सेवाभाव याशिवाय शास्त्र, सामाजिक शास्त्र, कला, मानव्यशास्त्र, भाषा याबरोबरच व्यावसायिक,तांत्रिक आणि व्यवसायाशी संबंधित विषय यासह एकविसाव्या शतकातील क्षमता विकसित करणे शक्य झाले पाहिजे. उच्च शिक्षणामुळे वैयक्तिक यश आणि आत्मज्ञान, निर्माणकारी सार्वजनिक सहभाग आणि समाजाला उत्पादनशील योगदान साध्य करता यायला हवे. अधिक अर्थपूर्ण आणि समाधानकारक जीवन व कामाचे स्वरूप यासाठी विद्यार्थ्यांना तयार केले पाहिजे आणि आर्थिक स्वातंत्र्य प्राप्त करण्यासाठी सक्षम केले पाहिजे.''[१] या उद्देशाने नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण तयार केलेले दिसते.एक सर्वसमावेशक धोरण म्हणून आणि विद्यार्थ्यांचा खऱ्या अर्थाने सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने हे नवीन शैक्षणिक धोरण महत्त्वपूर्ण असे आहे.

**मातृभाषेला प्राधान्य :**

नवीन शैक्षणिक धोरण ५+३+३+४ अशा टप्प्यानुसार असणार आहे. पहिली तीन वर्षे बालशिक्षण त्यानंतर पहिली व दुसरी इयत्ता अशी पाच वर्षे हा पहिला टप्पा. त्यानंतर तिसरी, चौथी,पाचवी हा तीन वर्षांचा दुसरा टप्पा. त्यानंतर इयत्ता सहावी, सातवी, आठवी हा तिसरा टप्पा. हा प्राथमिक स्तर म्हणून समजल्या जाईल. त्यापुढे नववी ते बारावी हा चार वर्षांचा माध्यमिक स्तर असणार आहे. असे या नवीन शैक्षणिक धोरणाचे स्वरूप असेल. आता आपल्याला विचार करायचा आहे तो आपल्या मातृभाषेचा. यात पहिल्या पाच वर्षाच्या टप्प्यात विद्यार्थ्यांना मातृभाषेतून शिक्षण अनिवार्य आहे. ही अतिशय स्तुत्य अशी बाब आहे. कारण जुन्या शैक्षणिक धोरणाप्रमाणे हे धोरण सुद्धा त्रिसूत्री पद्धतीचे आहे.त्यात मातृभाषा, राष्ट्रभाषा म्हणून हिंदी आणि तिसरी भाषा संस्कृत आणि पर्याय म्हणून इंग्रजी, कोरियन, जपानी, फ्रेंच, जर्मन, स्पॅनिश, पोर्तुगाली, रशियन इत्यादी विदेशी भाषा सुद्धा माध्यमिक स्तरावर अभ्यासता येईल. त्यामुळे वैश्वीक संस्कृतीचा विद्यार्थ्यांना परिचय होऊ शकेल. यात सर्वात महत्वाचा मुद्दा म्हणजे मातृभाषेतून शिक्षण हे विद्यार्थ्यांच्या बौद्धिक क्षमतेचा विचार करता अतिशय महतवाचे आहे. कारण बालपणी मुलाला ज्या गोष्टी मातृभाषेतून शिकता आल्या तर त्या एखाद्या घटनेची ,वस्तूची ओळख त्याला लवकर होते. कारण तो आपल्या मातृभाषेतूनच विचार करीत असतो व संबंधित गोष्टी वा संकल्पना मातृभाषेतून तो चांगल्या प्रकारे समजून घेऊ शकतो. यामुळे अल्पवयात त्याला शिक्षणाचे दडपण सुद्धा येणार नाही. आज ज्या कॉन्व्हेंट संस्कृतीत मुलं शिकत आहेत त्यांना ज्ञानार्जन करण्यास बऱ्याच अडचणींना सामोरे जावे लागत आहे. विषय ओळख होण्यासाठी त्याला मातृभाषेतून सांगणे गरजेचे ठरते. आधी विषय जर त्याला आपल्या मातृभाषेतून नीट कळला तर तो दुसऱ्या भाषेत अधिक सक्षमपणे मांडू किंवा लिहू शकेल. लहानपणापासून मुलं एका प्रादेशिक वातावरणात जगत असतात. त्या प्रादेशिक भाषेतील शब्द/ भाषा त्याला जगातील गोष्टींचे ज्ञान मिळवून देत असते. झाडे, नद्या, डोंगर, कुटुंब, मित्र, पाऊस, चंद्र, तारे ई. अनेक गोष्टींचा भावबंध त्याच्या मनाशी जोडला जातो. त्याच्या भावना त्या –त्या गोष्टींची जुळलेल्या असतात. त्यामुळे त्याच्या जगण्यात त्या-त्या वस्तूविषयाविषयी संवेदनशीलता जागृत असते. असा एक संवेदनशील विद्यार्थी तयार करणे हेही नवीन शैक्षणिक धोरणाचे महत्त्वाचे प्रयोजन आहे. ''मूल्याधारित शिक्षणामध्ये सत्य, धर्म, शांती, प्रेम अहिंसा, शास्त्रीय दृष्टिकोन, नागरिकत्व मूल्ये यासारखी मानवी, नैतिक, घटनात्मक आणि वैश्विक मानवी मूल्ये आणि जीवनकौशल्येसुद्धा समाविष्ट असतील; तसेच सेवेचे धडे,आणि समाजसेवा कार्यक्रमात सहभाग.हे सुद्धा सर्वांगीण शिक्षणाच्या अविभाज्य भाग मानले जातील.''[१] यावरून असा निष्कर्ष काढता येऊ शकतो की, ही सर्व अपेक्षा जर विद्यार्थ्यांकडून पूर्ण करवून घ्यायची असेल तर मातृभाषेतून शिक्षण देणे गरजेचे आहे. कारण बालवयापासून मुलांवर जे संस्कार होतात ते मातृभाषेतूनच. मातृभाषा त्याला सभोवतालचे ज्ञान देत असते.

मातृभाषेच्या संदर्भात दुसरा महत्वाचा मुद्दा हा की,त्या त्या प्रदेशाचा,संस्कृतीचा इतिहास हा मुळात त्या त्या भाषेत इतर भाषेपेक्षा अधिक सविस्तर आणि अचूकपणे लिहलेला असतो. तो पुस्तकातून त्या त्या प्रदेशाच्या मातृभाषेतून शिकवलं गेला तर विद्यार्थ्यांचे समाजभान आणि राष्ट्रभान अधिक सक्षमपणे वाढीस लागेल. माझी संस्कृती काय , भाषा काय , इतिहास काय , बलस्थाने आणि अडचणी काय याची साक्षरता त्याला होईल परिणामी आपल्या मातृभूमीशी त्याची नाळ अधिक घट्टपणे जुळली जाईल यात शंका नाही. आजच्या विस्तारीकरणाच्या, आधुनिकतेच्या आणि यंत्रयुगाच्या कोलाहलात विद्यार्थ्यांचे राष्ट्रभान यानिमित्ताने अधिक प्रभावी होऊ शकेल. आपल्या संस्कृतीचा भूतकाळ किंवा इतिहास समजून घेण्याचे कुतूहल त्यांच्यात निर्माण होऊन त्यातून नवीन संशोधन पुढे येऊ शकते ही बाब नवीन शैक्षणिक धोरणात लक्षात घेतलेली दिसते.आज आपलीच भाषा धड मुलांना लिहिता वाचता येण्यास अडचणी आहेत आणि त्यात त्यांना परकीय भाषा अल्पवयातच शिकवण्याचा अट्टहास करणे पूर्णतः चुकीचे आहे. अशाने त्यांची प्रतिभा खुंटीत होऊन शिक्षणाविषयी तो विद्यार्थी उदासीन होऊ शकतो हाही धोका आज संभवतो आहे. एक संभ्रमित शिक्षण पद्धती आज आपण बघतो आहे. विद्यार्थी संभ्रमित,त्यापेक्षा पालक संभ्रमित कारण अश्या समस्यांना सामोरे जाण्याची पालकांची पहिलीच वेळ असते कारण त्यांच्या काळी एवढा संभ्रम त्यांनी शिक्षणात अनुभवलेला नसतोच हे निर्विवाद सत्य आहे. फळ परिपक्व होण्याआधीच त्याला कीड लागावी तसे हे आहे. त्यामुळे मुलांना आधी मातृभाषेतून परिपक्व करून पुढच्या आव्हानांना पेलण्यास सज्ज करावे हा त्यावरचा उत्तम उपाय आहे.

तिसरा विचार करण्यासारखा मुद्दा आपण चर्चेला घेऊया. तो प्रत्येक राज्यांच्या मातृभाषेचा.भारतीय भाषा लोकसर्वेक्षण अध्यक्ष डॉ . गणेश देवी यांचे एक विधान चर्चेसाठी महत्वाचे ठरेल. ते म्हणतात, ''एखाद्या समाजाची भाषा निर्माण होण्यासाठी शतकानुशतकं लागतात. वेगवेगळ्या समाजांनी

ISSN No. 2394-5990

निर्माण केलेल्या भाषा हे आपल्या सगळ्यांचं सांस्कृतिक संचित आहे. त्यामुळे आपल्याच काळात एक प्रचंड जागतिक भाषासंहार होऊन त्या नष्ट होणार नाहीत, हे पाहणं ही आपल्या सगळ्यांची सामूहिक जबाबदारी आहे.[३] ही सामूहिक जबाबदारी लक्षात घेता नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण भाषासंवर्धनच्या दृष्टीने अतिशय महत्वाचे ठरते. भारत देशात ७०० भाषा आहेत(बोली मिळून). त्यापैकी २४ ह्या कोणत्या ना कोणत्या प्रदेशाची मातृभाषा म्हणून ओळखल्या जातात. जर या मातृभाषेतील भाषेतून प्राथमिक स्तरावर मुलांना शिक्षण दिले गेले तर सहजपणे भाषासंवर्धन होईल यात शंका नाही. अभ्यासक्रमासाठी लागणारी पुस्तके या भाषेतून छापली जाईल, हा अभ्यासक्रम शिकविण्यासाठी लागणाऱ्या शिक्षकाकरिता त्या भाषेतील पदवी त्याला प्राप्त करावी लागेल. आणि विद्यार्थी ती भाषा उत्तमप्रकारे ग्रहण करू शकेल व महत्वाचे म्हणजे भाषा बोलली जाऊ लागेल त्यामुळे भाषासंहार होण्याचा धोकाच संभवणार नाही. आपल्या भाषेचे संवर्धन करणे हे संपुर्णतः आपल्या हाती, सरकारच्या हाती आहे. अमुक एका भाषेमुळे आपली भाषा नष्ट होत आहे हा कांगावा ऐकू येणार नाही. मातृभाषेतून शिक्षण हे मरणप्राय भाषांना मिळालेली नवसंजीवनी आहे असा सकारात्मक विचार करूनच या नवीन धोरणाचा विचार आपण करायला हवा. तसेच आजच्या इंग्रजीच्या प्रभावामुळे आपल्याला आपल्या मातृभाषेतून कमीपणाचे वाटते तो न्यूनगंडसुद्धा नाहीसा होईल. असे सकारात्मक बदल या नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामुळे संभवू शकतात यात शंका नाही.

**निष्कर्ष :**

१) नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० हे एक सक्षम, सर्वगुणसंपन्न ,अष्टपैलू विद्यार्थी घडविण्यास बांधील आहे.

२) या धोरणात अल्पवयीन विद्यार्थ्यांचा बौद्धिक स्तर लक्षात घेऊन अभ्यासक्रमाची आखणी केलेली आहे.

३) भारतीय भाषांचे संवर्धन यातून घडून येईल.

४) आपापल्या संस्कृतीचा ,भाषेचा इतिहास विद्यार्थ्यांना समजून घेता येईल.

५) भाषासंवर्धनाबरोबरच नवीन प्रादेशिक साहित्याची निर्मिती होत राहील.

६) भाषा बोलली जाईल म्हणजे ती नष्ट होणार नाही.

**समारोप :**

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० हे बदलत्या काळानुसार बदल स्विकारण्याच्या प्रक्रियेतून निर्माण झालेले धोरण आहे. काळानुसार शिक्षणात बदल घडवून आणणे हे राष्ट्राच्या विकासाच्या दृष्टीने आणि प्रतिभासंवर्धनाच्या दृष्टीने अतिशय महत्वाचे असते. सद्यपरिस्थितीतील आव्हाने लक्षात घेऊन शैक्षणिक धोरण ठरविले जात असते. शिक्षणाचे अद्ययावतीकरण करणे यासाठी अत्यावश्यक ठरते. विद्यार्थ्यांच्या रूपाने एक बौद्धिक महासत्ता होणे हेही राष्ट्रासाठी आवश्यक असते. जगावर आपली छाप आणि वर्चस्वाकरीता अद्ययावत शस्त्रे, विमाने, तंत्रज्ञान महत्वाचे ठरते त्यापेक्षाही बौद्धिक संपदा निर्माण करणे ही आजच्या जगाची गरज ठरली आहे.

**संदर्भग्रंथ सूची :**


१) राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० ऑनलाईन मसुदा ,भाग २ उच्च शिक्षण ९.१.१ पृ. क्र. ४४

२) राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० ऑनलाईन मसुदा ,भाग २ उच्च शिक्षण ११.८ पृ. क्र. ४९

३) डॉ. गणेश देवी : ''भारतीय भाषांचे लोकसर्वेक्षण: महाराष्ट्र'' (प्रस्तावना) संपा. अरुण जाखडे, पद्मगंधा प्रकाशन, पुणे द्वितीय आवृत्ती २०२३ , पृ. क्र. ४०

VOLUME - XI, ISSUE - II - FEBRUARY - JULY - 2023
GENIUS - ISSN - 2279 - 0489 - IMPACT FACTOR - 6.538 (www.sjifactor.com) AP-03

# २५. पंडिता रमाबाई यांची स्त्रीविषयक सामाजिक कार्य

प्रा. डॉ. रची सोरते
श्री. पंढरीनाथ कला-वाणिज्य महाविद्यालय, नरखेड, जिल्हा-नागपूर.

## प्रस्तावना

पंडिता रमाबाई त्यांचे कार्य योगदान असलेल्या शरदा सदन आणि मुक्ती मिशन ह्या मुळे त्यांच्या पडलेल्या सामाजिक कार्य मध्ये भर पडली. त्यांनी केलेले स्त्री ह्यांच्या शिक्षण आणि वैद्यकीय मिशनरी कार्यात सहभाग आणि 1882 मध्ये प्रसिद्ध झालेले स्त्री धर्म नीती, महिलांसाठी नैतिकता हे पुस्तक त्यांनी लिहले. आणि त्यांनी स्त्री शिक्षणासाठी आणि त्यांच्या हक्कांसाठी त्यांनी अनेक परदेश वाऱ्या ही केल्या. समाजसुधारक पंडिता रमाबाई सरस्वती यांनी 19 व्या आणि 20 व्या शतकाच्या उत्तरार्धात शिक्षण आणि स्त्रियांच्या मुक्तीसाठी अथक परिश्रम केले आहे. पंडित रमाबाई ह्यांनी त्यांच्या कार्या मुळे ब्रिटन चा अमेरिकेचा प्रवास करावा लागला.

## शिक्षण

संस्कृतमध्ये पारंगत असलेली स्त्री म्हणून रमाबाईंची कीर्ती कलकत्त्यामध्ये पोहोचली, जिथे पंडितांनी त्यांना बोलण्यासाठी आमंत्रित केले. कलकत्ता विद्यापीठाने त्यांना 1878 मध्ये पंडिता आणि सरस्वती ही पदवी बहाल केली आणि तिच्या विविध संस्कृत कृतींच्या ज्ञानाची दखल घेतली. आस्तिक सुधारक केशबचंद्र सेन यांनी रामाबाईंना सर्व हिंदू साहित्यातील सर्वात पवित्र वेदांची एक प्रत दिली आणि ती वाचण्यास प्रोत्साहित केले.

## स्त्री शिक्षणास चालना

रमाबाईंनी बंगाली वकील बिपीन बिहारी मेधवी यांच्याशी त्यांचा विवाह 13 नोव्हेंबर 1880 रोजी नागरी समारंभात झाला विवाह झाला. या जोडप्याला एक मुलगी होती जिचे नाव त्यानी मनोरमा ठेवले. 1882 मध्ये मेधवीच्या मृत्यूनंतर, केवळ 23 वर्षांच्या रमाबाई पुण्यात गेल्या आणि त्यांनी स्त्री शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी एक संस्था स्थापन केली. अवघ्या 23 वर्षांच्या रमाबाई पुण्यात आल्या आणि त्यांनी स्त्री शिक्षणाला चालना देण्यासाठी एक संस्था स्थापन केली.

1882 मध्ये रामाबाईंचे पती मेधवीच्या मृत्यूनंतर, रमाबाई पुण्यात आल्या आणि त्यांनी आर्य महिला समाज ची स्थापना केली. त्या नंतर त्यांनी मुंबई, पंढरपूर, अहमदनगर, बार्शी, सोलापूर, ठाणे इ. ठिकाणी आर्य महिला समाज ची स्थापना केली, त्यांनी येशू ख्रिस्त, हिंदू सुधारक, आणि ब्राह्मण समाज यांच्या आदर्शांनी प्रभावित होऊन, समाजाचा उद्देश स्त्रियांच्या शिक्षणाच्या कारणास प्रोत्साहन दिले आणि बालविवाहाच्या अत्याचारापासून मुक्ती देणे हा होता. 1882 मध्ये भारताच्या वसाहतवादी सरकारने शिक्षणावर लक्ष ठेवण्यासाठी हंटर कमिशन नेमले होते, तेव्हा रमाबाईंनी त्याच्यापुढे पुरावे दिले.

हंटर कमिशनसमोर दिलेल्या भाषणात रमाबाईंने असे जाहीर केले की, "शंभरपैकी 99 प्रकरणांमध्ये या देशातील सुशिक्षित पुरुषांचा स्त्रीशिक्षण आणि स्त्रियांच्या योग्य स्थानाला विरोध आहे. जर त्यांना थोडासा दोष दिसला तर ते मोहरीचे दाणे डोंगरात वाढवतात आणि स्त्रीचे चारित्र्य बिघडवण्याचा प्रयत्न करतात". त्यांनी शिक्षकांना प्रशिक्षित करून महिला शाळा निरीक्षकांची नियुक्ती करावी. अशी सूचना त्यांनी केल्या. पुढे, त्या म्हणाल्या की, भारतातील महिलांची परिस्थिती अशी आहे की महिलाच त्यांच्यावर वैद्यकीय उपचार करू शकतात. त्यामुळे भारतीय महिलांना वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश मिळायला हवा.

रमाबाईंच्या पुराव्याने मोठी खळबळ उडाली आणि राणी व्हिक्टोरियापर्यंत पोहोचली. लॉर्ड डफरिनने महिला वैद्यकीय चळवळ सुरू केल्यावर त्याचे फळ पुढे आले. महाराष्ट्रामध्ये, रमाबाईंनी स्त्री शिक्षण आणि वैद्यकीय मिशनरी कार्यात सहभागी असलेल्या ख्रिश्चन संस्थांशी विशेषत: अँग्लिकन नन्सचा समुदाय, कम्युनिटी ऑफ सेंट मेरी द व्हर्जिन संपर्क साधला.

# भारतीय लोकशाही पुढील नवीन आव्हाने
## (एक महत्वपूर्ण आर्थिक अवलोकन)

**सहा. प्रा. डॉ. रवी एस. सोरते**
श्री पंढरीनाथ कला-वाणिज्य महाविद्यालय, नरखेड.
(अर्थशास्त्र विभाग)
ravissorte@gmail.com

**सारांश :**

